**पुणे येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयातील**
**आरोपीचे निवेदन.**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्रं. २०११७/२०२४**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | : | २६.०२.२०२४ |
| फिर्याद दिल्याची तारीख | : | २६.०२.२०२४ |
| फिर्यादीचे नाव | : | व्हि.के.शिर्के<br>पो.हवा. ६४३२, चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन |
| आरोपीचे नाव | : | **मकसुद इकादिम शेख**<br>वय – ४३ वर्षे, व्यवसाय – पान शॉप<br>रा. कस्तुरबा वसाहत, गणेशखिंड रोड, औंध, पुणे |

गुन्हयाचा तपशील खालीलप्रमाणे :

**१.** दिनांक २६.०२.२०२४ रोजी १४.२५ वाजण्याच्या सुमारास कस्तुरबा वसाहत, पुणे येथे तुम्ही तुमच्या महाराष्ट्र पान शॉपमध्ये तंबाखु जन्य पदार्थ, गुटखा, सिगारेट इत्यादी पदार्थ ग्राहकांना विक्री करताना मिळुन आलात. म्हणून तुम्ही सिगरेट, तंबाखुजन्य पदार्थ जाहिरात प्रतिबंध अधिनियमचे कलम ६(ब) सह कलम २४ अन्वये शिक्षेस पात्र असा गुन्हा केला आहे.

**२.** : तुम्हाला दोषारोपपत्राच्या नकला मिळाल्या का?
उत्तर : होय.

**३.** : आता तुमच्यावर आरोप ठेवले व तुम्हांला वाचुन व समजावुन सांगितले ते तुम्हांला समजले काय?
उत्तर : होय.

**४.** : तुम्हांला गुन्हा कबुल आहे का?
उत्तर : मला गुन्हा कबूल आहे.

आरोपीची सही
दिनांक : ०३/०३/२०२४

**(श्रीमती व्ही. ए. मकानदार)**
१७ वे सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
पुणे

## न्यायनिर्णय

(आदेश पारित दिनांक ०३.०३.२०२४)

आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबूल केला आहे व आरोपीने गुन्हा कबूल केला असल्याने त्यास दोषी धरण्यात येत आहे. आरोपीचे म्हणणे ऐकले. आरोपीने कथन केले की, त्याची गुन्हेगारी पार्श्वभुमी नाही व त्याचेवर संपूर्ण कुटुंब अवलंबून आहे. करिता, कमीत कमी दंड करण्यात यावा. तसेच त्यास परिविक्षा अधिनियमाखाली मुक्त करण्यात यावे. आरोपीवर असलेल्या गुन्हयाचे स्वरुप पाहता त्यास परिविक्षा अधिनियमाचा लाभ देणे उचित नाही व त्यास चांगल्या वर्तणुकीच्या बंधपत्रावर मुक्त करणे न्यायोचीत होणार नाही. करिता, पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपी **मकसुद इकादिम शेख** यास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये सिगरेट, तंबाखुजन्य पदार्थ जाहिरात प्रतिबंध अधिनियमचे कलम ६(ब) सह कलम २४ या गुन्हयासाठी दोषी ठरविण्यात येत आहे आणि दंड रूपये **२००/—(रूपये दोनशे फक्त)** इतक्या दंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे. दंड न भरल्यास दोन दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा सुनाविण्यात येत आहे.

२. आरोपीस आदेशाची प्रत मोफत दयावी.

**(श्रीमती व्ही. ए. मकानदार)**
दिनांक : ०३/०३/२०२४ १७ वे सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
पुणे

# प्रमाणपत्र

मी अशी खात्री देतो की, सदर पी. डी. एफ. फाईलमधील मजकूर मुळ आदेशाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | — | श्री. महेश राजीरु गुन्नाल,<br>लघुलेखक ग्रेड — ३ |
| न्यायालयाचे नाव | — | श्रीमती व्ही. ए. मकानदार<br>१७ वे सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,<br>जि. पुणे. |
| आदेश / न्यायनिर्णय दिनांक | — | ०३/०३/२०२४ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केलेला दिनांक | — | ०३/०३/२०२४ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | — | ०४/०३/२०२४ |